Bhartiya Gramin Punarrachana Sanstha's

**Mumbai B. Ed. College For Women Wadala (E) Mumbai - 400037**

Affilited to SNDT Women University Mumbai
Organize

*PROCEEDING*


of

ONE DAY NATIONAL CONFERENCE

On

# HIGHER EDUCATION AND SKILL DEVELOPMENT IN 21st CENTURY

**MARATHI**



**20 February, 2017**


Editor in Chief

Dr. Rihana Inamdar

Editor

Asst. Prof. Khuba C. Rathod

Asst. Prof. Kavita S. Thakur

Asst. Prof. Shireen A. Patel


AJANTA PRAKASHAN

Scanned with CamScanner

## मराठी अनुक्रमाणिका



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | शिक्षण पद्धती आणि अध्यापन कौशल्य<br>प्रा. सुप्रिया दिनानाथ पावसकर | ४४-४६ |
| १५ | शिक्षकांच्या व्यावसायिक समाधानावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास - एक सर्वेक्षण<br>प्रा. कविता संदेश ठाकूर | ४७-४९ |
| १६ | उच्चशिक्षण कौशल्य विकसनात होणारे बदल<br>प्रा. सौ. छाया शिवाजी शिरसाट | ५०-५४ |
| १७ | शिक्षण विषयक संयुक्त राष्ट्रसंघटनेची भुमिका व आव्हाने<br>रमेश इसऱ्या राऊत | ५५-५९ |
| १८ | मेघदूत - अनुवादातील वैविध्य<br>डॉ. मीनल श्रीगिरीवार | ६०-६३ |
| १९ | शिक्षणशास्त्र महाविद्यालयात अध्यापन क्षेत्रात शिक्षकाचे व्यावसायिक कौशल्य<br>सहा. प्रा. श्री. गणेश सुर्यकांत कुळकर्णी | ६४-६७ |
| २० | भारतातील समाज सुधारक आणि सुधारणा<br>कु. मेहेत्रे मनीषा प्रभाकर | ६८-७२ |
| २१ | भाषिक कौशल्ये व त्यांची व्यक्तिमत्व विकासातील भूमिका<br>सहा. प्रा. स्वाती सहदेव मिरजुळकर | ७३-७५ |
| २२ | उच्चप्राथमिक स्तरावरील शिक्षकांना जीवन कौशल्यांची रुजवणूक करतांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास व उपाय योजना<br>प्रा. डॉ. कविता साळुंके<br>कु. ज्योती लष्करी | ७६-७९ |
| २३ | भारताचे अर्थव्यवस्थेत नोटबंदीनंतर पून्हा निराशा<br>प्रा. डॉ. सुभाष प्रभू राठोड | ८०-८२ |
| २४ | जीवनकौशल्य विकासात शिक्षकाची भुमिका<br>प्रा. सुवर्णा नितिन ढवळे | ८३-८५ |
| २५ | गडचिरोली जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन<br>हेमंत केशवराव बारसागडे | ८६-८८ |





Scanned with CamScanner

ROYAL - ISSN - 2278 - 8158 - IMPACT FACTOR - 3.524 (www.sjifactor.com)

# २२ उच्चप्राथमिक स्तरावरील शिक्षकांना जीवन कौशल्यांची रुजवणूक करतांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास व उपाय योजना

प्रा. डॉ. कविता साळुंके
सहयोगी प्राध्यापक
कु. ज्योती लष्करी
संशोधक विद्यार्थी, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, य. च. म. मु. विद्यापीठ, नाशिक.

## १) प्रस्तावना

जीवन कौशल्ये शिक्षण म्हणजे दैनंदिन जीवनातील गरजा आणि आव्हानांना सामोरे जाण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला क्षमता संपन्न करण्या-या सामाजिक - मानसिक क्षमता म्हणजेच जीवन कौशल्य क्षमता आहेत.या क्षमतांचा विकास करण्यासाठी जीवन कौशल्य शिक्षणाचा समावेश २००५ नंतर शालेय अभ्यासक्रमात करण्यात आला.

ज्ञानरचनावादी दृष्टीकोनातून अध्ययन अध्यापन करतांना जीवन कौशल्यांचे शिक्षण देणे अधिक सोप होऊ शकते त्यासाठी [illegible] पध्दतीने विचार करण्यासाठी त्या विचारांना व्यवहारोपयोगी बाबींची जोड दयावी.दैनंदिन अनुभव विचारात घेऊन त्यांचा आपल्या जीवनाशी संबंध जोडावा. जीवन कौशल्य शिक्षणाच्या माध्यमातून जीवन आणि शिक्षणा यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला तरच शिक्षण हे जीवनाभिमुख होईल.यादृष्टीने प्राथमिक,उच्च प्राथमिक स्तरावर प्रयत्न ही केले जातात.शालेय स्तरावरील सर्व विषयांमध्ये जीवन कौशल्यांचा समावेश केलेला आढळतो.प्रत्येक शिक्षक आप-आपल्या विषयानूसार विविध कृतिकार्यक्रमाचा माध्यमातून,विविध अध्ययन अनुभूतीचा माध्यमातून जीवन कौशल्यांचे शिक्षण देतांना दिसतात. काही ठिकाणी शाळा देखील जीवन कौशल्यांचे शिक्षण देण्यासाठी शिक्षकानां आवश्यक सोयी उपलब्ध करून देते जसे विद्यार्थी संख्ये नुसार क्रीडांगण,ग्रंथालय व प्रयोगशाळेची सोय,शाळेतील शिक्षकांना जीवन कौशल्ये शिक्षणाचे प्रशिक्षण देण्यासाठी कार्यशाळांना पाठवते,जीवन कौशल्ये शिक्षण प्रशिक्षण साहित्य उपलब्ध करून देते.तज्ञांची व्याख्यान कृतिसत्रे,समुपदेशकाची [illegible] ,शाळा,पालक शिक्षक व विद्यार्थी या मध्ये सुसंवाद घडण्यासाठी सभा घेते,शैक्षणिक सहल,गिर्यारोहण,समाजसेवा शिबिरे सामाजिक संस्था भेटी,विविध उपक्रमाचे आयोजन,व्यसनांचे परिणाम,एच.आय.व्ही./एडस,विविध साथीचे रोग आणि अनारोग्य टाळून चांगला सामाजिक आरोग्य [illegible] विविध माहितीपट आणि लघुपट यांच्या माध्यमांतून तसेच प्रदर्शन भरवून विद्यार्थ्यांना माहिती दिली जाते .वरील पध्दतीचे कार्य काही [illegible] शाळेतच केले जाते.विविध विषयातून ही जीवन कौशल्ये रुजविता यावी यासाठी शिक्षक विविध अध्ययन - अनुभूतीचा वापर करतो, [illegible] संशोधनाच्या निष्कर्षावरून असे लक्षात येते की काही ठिकाणी ३० % शिक्षक जीवन कौशल्ये रुजविण्याचा प्रयत्न करतात. ६०% शिक्षक प्रभावीरित्या प्रयत्न करत नाही, तर २० % शिक्षकांना जीवन कौशल्यांविषयी सखोल माहिती नाही. यावर आधारित प्रभावी असे शासनाकडून प्रशिक्षण कार्यक्रमदेखील झालेले नाहीत, प्रशिक्षण झाले ते सर्व विषयांचे एकत्रित घेतले जातात.म्हणून शिक्षकाला अध्ययन अध्यापनातून जीवन कौशल्ये रुजविण्यात अडचणी येतात.म्हणून प्रत्येक विषयाचे स्वतंत्र व जास्त कालावधीचे प्रशिक्षण होणे आवश्यक आहे हे शिक्षकांच्या मूलाखती वरुन लक्षात येते.

## २) संशोधनाची गरज

विद्यार्थ्यांच्या अंगी जीवन कौशल्ये रुविण्यासाठी शिक्षकांना कोणकोणत्या अडचणी येतात हे जाणून घेण्यासाठी सेशोधन गरजेचे आहे.तसेच विद्यार्थ्यांची अंगभृत कौशल्ये विकसित करतानाची सद्य:स्थिती लक्षात घेऊन शिक्षकांना येणाज्या समस्या व त्यावर उपाय [illegible]



८१

करण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजचे आहे.व जीवन कौशल्यांचे शिक्षण देणे ही प्रत्येक शिक्षकाचे कर्तव्य व जबाबदारी आहे.म्हणून प्रत्येक मानवी घटकाला विषयनिहाय जीवन कौशल्ये विकसन कार्यक्रम तयार करण्यासाठी प्रस्तुत संशोधन हे गरजेचे आहे.

३) संशोधनाचे महत्त्व

जागतिक आरोग्य संघटनेने सांगितलेली जीवन कौशल्ये रुजविण्यासाठी शिक्षकाला कोणकोणते उपक्रम घेतो येऊ शकतात याचे मार्गदर्शन या संशोधनामुळे होऊ शकते व शालेय स्तरावरील शिक्षकांना जीवन कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये विकसित करताना कोणकाणत्या अडचणी येतात याची जाणीव झाल्यामुळे त्या अडचणी सोडविण्यासाठी शिक्षकानां काय करता येऊ शकते याची दिशा मिळू शकते प्रत्येक विषयाची अध्यापनी उद्दिष्टे व जीवन कौशल्ये यांची सांगड घालून व विविध विषयाचे एकमेकांशी समवाय साधून जीवन कौशल्ये वर्गाध्यापनातून विद्यार्थ्यांन मध्ये रुजविता येऊ शकतात हयासाठी हे संशोधन उच्चप्राथमिक स्तरावरील शिक्षकांना उपयुक्त आहे.

४) संशोधन समस्येचे विधान

उच्चप्राथमिक स्तरावरील शिक्षकांना जीवन कौशल्यांची रुजवणूक करतांना येणाज्या अडचणींचा अभ्यास व उपाय योजना

५) संशोधनाची उद्दिष्टे

५.१) उच्चप्राथमिक स्तरावरील शिक्षकांना जीवन कौशल्यांची रुजवणूक करतांना येणाज्या अडचणीचा शोध घेणे.

५.२) उच्चप्राथमिक स्तरावरील शिक्षकांना जीवन कौशल्याची रुजवणूक करणेसाठी काही उपाययोजना सुचविणे.

६) संशोधनाची गृहितके

६.१) उच्चप्राथमिक स्तरावरील शिक्षकांकडून विविध विषयांचा अध्यापानूत जीवन कौशल्यें रुजविण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात नाही.

६.२) शालेय स्तरावरील विषयासाठी दिले जाणारे अध्ययन अनुभव व जीवन कौशल्यांची रुजवणूक यामध्ये परस्परसंबंध असतो.

७) संशोधनाची व्याप्ती

७.१) प्रस्तुत संशोधन हे उच्चप्राथमिक स्तरावरील इयत्ता ५ वी ८वी च्या शिक्षकांशी संबंधीत आहे.

७.२) प्रस्तुत संशोधनात नंदूरबार जिल्हयातील अक्कलकुवा तालुक्याचा विचार केला आहे.

७.३) प्रस्तुत संशोधन हे अक्कलकुवा तालुक्यातील शैक्षणिक वर्षे २०१७-२०१८ मधील उच्चप्राथमिक स्तरावरील विविध विषयाचे अध्यापन करणाज्या शिक्षकानां जीवन कौशल्याची रुजवणूक करतांना येणाज्या अडचणीची संबधित आहे

८) संशोधनाच्या मर्यादा

८.१) प्रस्तुत संशोधन हे उच्चप्राथमिक स्तरावरील अध्यापन करणाज्या शिक्षकांनपुरते मर्यादित आहे.

८.२) प्रस्तुत संशोधन हे अक्कलकुवा तालुक्यातील अक्कलकुवा शहरापुरते मर्यादित आहे.

८.३) प्रस्तस्तृ संशोधन हे जीवन कौशल्यांची रुजवणूक करतांना येणाज्या अडचणी पुरते मर्यादित आहे.

८.४) प्रस्तुत संशोधनात फक्त शैक्षणिक वर्ष २०१७ चा विचार केला जाणार आहे.

९) संशोधनाची कार्यपध्दती

९.१) संशोधन पध्दती

प्रस्तुत संशोधनात उच्चप्राथमिक स्तरावरील शिक्षकांना जीवन कौशल्यांची रुजवणूक करतांना येणाज्या अडचणींचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीमधील सर्वेक्षण पध्दती वापरली.मुलाखत या तंत्राचा आधारे शालेय स्तरावरील शिक्षकांना काणेत्या अडणची येतात्त या बद्दलची माहिती संकलित केली आहे.



Scanned with CamScanner

९.२) संशोधनाची साधने

प्रस्तृत संशोधनासाठी संशोधिकेने शिक्षकांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी मुलाखत या साधनाचा वापर केला आहे.यात संरचित मुलाखतीचा वापर केला आहे.

९.३) नमुना निवड

प्रस्तृत संशोधनासाठी संशोधिकेने सर्वेक्षण पध्दतीनुसार नमूना निवड केली होती.सर्वेक्षण पध्दतीसाठी अक्कलकूवा शहरातील शाळेतील ८५ शिक्षकांपैकी ४० शिक्षकांची निवड ही संभाव्यतेवर आधारति सुगम यादृच्छिक नमून निवड पध्दतीतने केली

९.४) संख्याशास्त्रीय तंत्रे

शेकडेवारी या संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर करून संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचण करण्यात आले.

९.५) माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्राप्त माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण करून टक्केवारीत रूपांतर करण्यात आले.सारणीकरणाच्या आधारे निरीक्षणे काढून त्यांचे अन्वयार्थ लावण्यात आले व त्यावरून निष्कर्ष काढण्यात आले.

संशोधकाने संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करून पुढील निष्कर्ष प्रातिनिधिक स्वरूपात नोंदविले आहेत.

१०) निष्कर्ष

शिक्षकांच्या मुलाखतीव्दरे प्राप्त माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचनावरून मिळालेले निष्कर्ष

१) जीवन कौशल्यांचे शिक्षणा बद्दल १५% शिक्षकांना पाहिजे तेवढया प्रमाणात ज्ञान नाही

२) अशैक्षणिक कामे जास्त असल्याने जीवन कौशल्यांचे उपक्रम विद्यार्थ्यांवर राबविता येत नाही

३) ३०% शिक्षकांना जीवन कौशल्ये शिक्षणा विषयी झालेल्या प्रशिक्षणा विषयी त्रुटी जाणवतात.

४) ४५% शिक्षकांना जीवन कौशल्ये शिक्षण देण्यासंबंधी पुरेसा वेळ मिळत नाही.

५) ५०% विनाअनुदानीत शिक्षकांना प्रशिक्षणाचा लाभ मिळत नाही.म्हणून जीवन कौशल्ये शिक्षण म्हणजे नेमक काय असते कराव या विषयी अडचण जाणवते

६) खाजगी शाळेतील शिक्षकांना जीवन कौशल्यांचे शिक्षण देण्यासंबंधीचे मार्गदर्शन दिले जाते.

७) ज्ञानरचनावादी पाठाघेण्यासाठी पाहिजे तसे वातावरण शाळेत दिसत नाही.

८) २०%शिक्षकांना शाळेत जीवन कौशल्यांचे शिक्षण देण्यासाठी आधुनिक साधनांचा अभाव जाणवतो

९) २% शिक्षकांना जीवन कौशल्यांचे प्रशिक्षण कधी घेतले जाते या विषयी माहिती दिली जात नाही.

१०) सामाजिक शास्त्र सारख्या विषयाला वार्षिक तासिका कमी असल्याने शिक्षकांना जीवन कौशल्यांनुसार पाटांची रचना करणे अवघड जाते.

१०) तंत्रज्ञान हातळणीचे प्रशिक्षिण ग्रामिण भागातील शिक्षकांना मिळत नाही.

११) ग्रामीण भागात विदृयत पुरवठयाचा अभाव असल्याने उपलब्ध असणाज्या तासिकेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करता येत नाही.

१२) जीवन कौशल्यांचे शिक्षण देण्यासाठी प्रत्येक्ष अनुभवांची गरज असते.मात्र या प्रत्येक्ष अनुभवासाठी पालक व कुटुंबातील इतर सदस्य यांची आवश्यकता असते तसे सहकार्य ग्रामीण भागातील शिक्षकांना पालकांकडून मिळत नाही

मिळालेल्या निष्कर्षांनुसार काही प्राथमिक स्तरावर उपाययोजना सुचविता येऊ शकतील



Scanned with CamScanner

९.२) संशोधनाची साधने

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने शिक्षकांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी मुलाखत या साधनाचा वापर केला आहे.यात संरचित मुलाखतीचा वापर केला आहे.

९.३) नमुना निवड

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने सर्वेक्षण पध्दतीनुसार नमूना निवड केली होती.सर्वेक्षण पध्दतीसाठी अक्कलकुवा शहरातील शाळेतील ८५ शिक्षकांपैकी ४० शिक्षकांची निवड ही संभाव्यतेवर आधारति सुगम यादृच्छिक नमून निवड पध्दतीतने केली

९.४) संख्याशास्त्रीय तंत्रे

शेकडेवारी या संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर करून संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचण करण्यात आले.

९.५) माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्राप्त माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण करून टक्केवारीत रूपांतर करण्यात आले.सारणीकरणाच्या आधारे निरीक्षणे काढून त्यांचा अन्वयार्थ लावण्यात आले व त्यावरून निष्कर्ष काढण्यात आले.

संशोधकाने संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करून पुढील निष्कर्ष प्रातिनिधिक स्वरूपात नोंदविले आहेत.

१०) निष्कर्ष

शिक्षकांच्या मुलाखतीव्दरे प्राप्त माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचनावरून मिळालेले निष्कर्ष

१) जीवन कौशल्यांचे शिक्षणा बद्दल १५% शिक्षकांना पाहिजे तेवढया प्रमाणात ज्ञान नाही

२) अशैक्षणिक कामे जास्त असल्याने जीवन कौशल्यांचे उपक्रम विद्यार्थ्यांवर राबविता येत नाही

३) ३०% शिक्षकांना जीवन कौशल्ये शिक्षणा विषयी झालेल्या प्रशिक्षणा विषयी त्रुटी जाणवतात.

४) ४५% शिक्षकांना जीवन कौशल्ये शिक्षण देण्यासंबंधी पुरेसा वेळ मिळत नाही.

५) ५०% विनाअनुदानीत शिक्षकांना प्रशिक्षणाचा लाभ मिळत नाही.म्हणून जीवन कौशल्ये शिक्षण म्हणजे नेमक काय अध्यापन कराव या विषयी अडचण जाणवते

६) खाजगी शाळेतील शिक्षकांना जीवन कौशल्यांचे शिक्षण देण्यासंबंधीचे मार्गदर्शन दिले जाते.

७) ज्ञानरचनावादी पाठाघेण्यासाठी पाहिजे तसे वातावरण शाळेत दिसत नाही.

८) २०%शिक्षकांना शाळेत जीवन कौशल्यांचे शिक्षण देण्यासाठी आधुनिक साधनांचा अभाव जाणवतो

९) २% शिक्षकांना जीवन कौशल्यांचे प्रशिक्षण कधी घेतले जाते या विषयी माहिती दिली जात नाही.

१०) सामाजिक शास्त्र सारख्या विषयाला वार्षिक तासिका कमी असल्याने शिक्षकांना जीवन कौशल्यांनुसार पाठांचे रचना करणे अवघड जाते.

१०) तंत्रज्ञान हातळणीचे प्रशिक्षिण ग्रामिण भागातील शिक्षकांना मिळत नाही.

११) ग्रामीण भागात विदृयत पुरवठयाचा अभाव असल्याने उपलब्ध असणाज्या तासिकेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करता येत नाही.

१२) जीवन कौशल्यांचे शिक्षण देण्यासाठी प्रत्येक्ष अनुभवांची गरज असते.मात्र या प्रत्येक्ष अनुभवासाठी पालक व समाजातील इतर सदस्य यांची आवश्यकता असते तसे सहकार्य ग्रामीण भागातील शिक्षकांना पालकांकडून मिळत नाही

मिळालेल्या निष्कर्षांनुसार काही प्राथमिक स्तरावर उपाययोजना सुचविता येऊ शकतील



Scanned with CamScanner

ROYAL - ISSN - 2278 - 8158 - IMPACT FACTOR - 3.524 (www.sjifactor.com)


**उपाययोजना**

१) जीवन कौशल्यांच्या शिक्षणाच्या प्रशिक्षणाची माहिती ही शिक्षकांना वेळोवेळी मुख्याध्यापकांकडुन देण्यात यावी.

२) यशादा व S.C.R.E.T हे वेळोवेळी जीवन कौशल्य शिक्षण कसे द्यावे याचे प्रशिक्षण घेत असते ते प्रशिक्षणसर्वशिक्षकांना अनिर्वाय करावे.

३) शिक्षकांना संदभांत प्रसार माध्यमातून घेण्यात येणार उपक्रम रेकांर्डीग करुन विद्याथ्यांना दाखविण्यास प्रेरित करावे.

४) प्रत्येक शिक्षकांनी समवाय पध्दतीने जीवन कौशल्य शिक्षण देण्याचा प्रत्यन करावा.

५) विविध अभ्यासपुरक कार्यक्रमातून व दिन विशेष कार्यक्रमातून जीवन कौशल्ये हे रूजविण्याचा प्रयत्न करावा.

६) विविध प्रकारच्या कृतीकार्यक्रमाचे आयोजन करून जीवन कौशल्ये रुजविण्यात हातभार लावावा.

७) कृतीसंशोधनाव्दारा कार्यान्वित केलेल्या कौशल्य विकसनाचा पडताळा घ्यावा.

**संदर्भग्रंथ सूची**


१) आगलावे पी..(२०००):,'संशोधन पध्दती व तंत्र.विद्या प्रकाशन, नागपूर.

२) भांडारकर पु.ल..(१९९९):,'सामाजिक संशोधन पद्धती.'महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, औरंगाबाद.

३) भिंताडे वि.रा..(२००६):.'शैक्षणिक संशोधन पद्धती.' नित्यनूतन प्रकाशन, पुणे.

४) मुळे रा.श.आणि उमाठे वि.तु..(१९८७):.'शैक्षणिक संशोधनाचो मुलतत्वे. महाराष्ट्र ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर.

५) जगताप ह.ना.(२००६):.'शैक्षणिक संशोधन पद्धती,'नूतन प्रकाशन,पुणे.

६) बोरुडे रा.र..(२००८):.संशोधन पद्धतीशास्त्रातील,' पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे.

७) पंडित बी.बी..(२००५):.' शिक्षणांतील संशोधन.' नूतन प्रकाशन. पुणे.

८) यंशवतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, (२०१५),' संशोधन मार्गदर्शक मालिका.'य.च.म.मु.वि.नाशिक.

९) संगोलकर अरुण.,(२०११):,'नवीन जागतिक समाजातील नवविचार प्रवाह,'इनसाईट पब्लिकेशन,नाशिक.

१०) खोडवे ज्ञानेश्वर.(२००८):,'इ.५ वीच्या मराठी (प्रथम भाषा) या पाठयपुस्तकातील जीवन कौशल्यांचे अध्यापन शास्त्रीय विश्लेषण,' शिक्षण समिक्षा.

१२) राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५.'

१३) राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,'राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१०,'

१४) वास्कार पुष्पा.,(२०१३):,'दैनंदिन भाषा अध्यापनातून जीवन कौशल्यांची रुजवणूक,' शिक्षण समिक्षा.

१५) Swamy Raju (२०११) Life skill Education:Ruby in The crown of Human Development,'University news.

१६) Best,John,J.W.,Research in Education,' Prentic Hall of India Private Limited,New Deihi.

१७) Jhon W.creswell.,(२०१२):,डEducation Research,डpeorson Education,डicn,Boston,U.S.A.(fourthEdition).




Scanned with CamScanner